# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०१/२०२६ (मंगळवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये गुन्हेगारी मध्ये घट झाली असुन अवैध धंदयावरील कारवाई मध्ये वाढ झाली.

मा.श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी अवैध धंदयातील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्याने सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये गुन्हेगारी मध्ये घट झाली असुन मध्ये अवैध धंद्यांवरील कारवाई मध्ये वाढ झालेली आहे.

सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये मोटर सायकल चोरीच्या गुन्हयात ९१ ने घट, दरोडयाच्या गुन्हयात २ ने घट, घरफोडी २८ ने ,चोरी २३७ ने ,दंगा १५ ने तसेच दुखापतीच्या गुन्हयात ११६ ने घट झालेली आहे. **एकुणच शरीराविरूध्द आणि मालमत्तेविरूध्द गुन्हयामध्ये सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये २८५ ने घट झालेली आहे.**

अवैध धंदयांवर विशेष मोहीम राबवुन केलेल्या कारवाई मुळे अवैध दारू च्या गुन्हयावरील कारवाईत २४९ ने वाढ झाली, अंमल पदार्थ विक्री /तस्करी गुन्हयाबाबत कारवाई मध्ये ७२८ ने वाढ झाली. जिवनाश्यक वस्तु कायदा कारवाई मध्ये ६ ने वाढ तसेच मोटर वाहन कायदयाअन्वये करण्यात आलेल्या कारवाई मध्ये १२१५ अशी लक्षणीय वाढ झाली आहे. तसेच **एम.पी.डी.ए. कारवाई मध्ये १८ ने वाढ झाली असुन सन २०२५ मध्ये संघटित गुन्हेगारी करणाऱ्यां आरोपीतांच्या ७ टोळयांमधील एकुण ४३ आरोपींवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्हयातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ६६ अधिकारी/अंमलदार यांना प्रशस्तीप्रत देवुन गौरविण्यात आले.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ६६ पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या कामाची दखल घेवुन त्यांनी केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनिय कामगिरी साठी दिनांक १३/०१/२०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीत त्यांना प्रशस्तीप्रत देवुन गौरविण्यात आले.

**सदर वेळी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे समक्ष डींबतपउम ै चे यशस्वीरित्या सादरीकरण केल्याबाबत, आरोपीतांवर मकोका डब्ळ।ए एमपीडीए या सारख्या प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई केल्या बाबत अंमली पदार्थ विरोधी कारवाई, गुन्हे उघडकीस आणले बाबत, उत्कृष्ट तपास करून दोषसिध्दी झालेबाबत अशा उल्लेखनिय कामगिरी साठी नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६ पोलीस अधिकारी / अंमलदार** यांना प्रशस्तीप्रत देवुन गौरविण्यात आले. सदर वेळी श्री अनिल म्हस्के, अप्पर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या सह सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रमुख हजर होते.



## पोलीस अंमलदाराने विहीरीत उडी घेतलेल्या शेतकऱ्याचे वाचविले प्राण

दिनांक १२/०१/२०२६ रोजी दुपारी १२/०० वाजेच्या सुमारास काटोल पोलीस हे तहसीलदार काटोल यांचे आदेशाने संबधीत कार्यालय उपविभागीय अभियंता जि.प. बांधकाम विभाग काटोल, उपअधिक्षक भुमी अभिलेख, काटोल, सचिव ग्राम पंचायत खानगाव, पोलीस स्टेशन काटोल येथील संबधीत अधिकारी व कर्मचारी यांचे मदतीने मौजा खानगाव शिवारातील शेत सर्वे क्रं. १४४/२ वरील पांदन रस्त्यावरील अतीक्रमण काढणेकरीता सिंमाकन करण्याची कार्यवाही करत असतांना शेत सर्वे क्रं. १३५ क्षेत्र ०.७७ हे. आर. चे सामायीक खातेदारा पैकी श्री. अरूण रामप्रसाद चिंचोरीया रा. खानगाव यांने विहरी जवळील शेत सिंमाकन करीत असतांना अरूण चिंचोरिया याने अडथळा निर्माण केला. त्यानंतर

जेसीबीचे साहाय्याने रस्त्यामध्ये येणारे झाडे तोडत असतांना जेसीबी समोर जावून जेसीबी पुढे जावू नये म्हणून अडथळा निर्माण केला तसेच तुम्ही सिंमाकन तात्काळ थांबवा असे म्हणून शासकीय कामात अडथळा निर्माण करीत स्वत:चे शेतातील विहरीमध्ये उडी मारली.

**त्यावेळी तिथे पोलीस निरीक्षक श्री रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी काटोल यांच्यासह काटोल पोलीस स्टेशनचा स्टाफ हजर होता. तिथे हजर असलेले पोलीस अंमलदार प्रमोद कोहळे ब.नं ४०५ यांनी तात्काळ कोणतीही पर्वा न करता विहीरीत उडी घेत अरूण चिंचोरिया यांचे प्राण वाचविले. सदर प्रकरणी अरूण चिंचोरिया यांचेवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

## वाहनासह ४५ लाख ३० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १२/०१/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ट्रक क्रमांक एम एच ४०/डी सी —३२१० या वाहनाने पवनी नागभीड रोडकडुन नागपूरकडे टिप्परमध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती भरून येत आहे. अशा मिळालेल्या माहीतीच्या आधारे पथकाने मौजा जावराबोडी शिवार येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्रमांक एम एच ४०/डी सी —३२१० हे वाहन मिळून आले. वाहन संशयीत वाटल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रकचा **चालक नामे १) महेश संजय वैद्य, वय २१ वर्ष, रा. पाचगाव उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर क्लिनर नामे** २) **मुकेश जयपाल मेश्राम, वय १९ वर्ष, रा. पाचगाव उमरेड, तालुका उमरेड जिल्हा नागपूर हे मिळुन आले. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक आरोपी क्रं ३) मंगेश सुखदेव धावडे, रा. खेडी, ता. मौदा जि. नागपूर हा असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी वाहन चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) ट्रक क्रमांक एम एच ४०/डी सी —३२१० किंमती ४५,००,०००/— रूपये २) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण ४५,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनिय १९८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १३/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७२२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक १२/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ८,४४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत आरोपी क्र. १) राजेश फत्तु देव्हारे, वय ४० वर्ष, २) प्रविण महादेव देव्हारे, वय ५० वर्ष, दोन्ही रा. गोठणगाव ता. कुही** याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार **अंतर्गत आरोपी दमडु दशरथ कुंभलकर, वय ४५ वर्षे, रा. हिवराबाजार, ता. रामटेक** याचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी** येथे **आरोपी सुरेश शेषराव थोटे, वय ३३ वर्ष, रा. तूरकमारी सातगाव, ता. हिंगना, जि. नागपूर** याचेवर १ गुन्हा नोंद आहे अशा एकुण ०४ **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे दाखल केले आहे.**

## पोस्टे कन्हान हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हानः—** दिनांक १२/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, जुना नगर परीषदच्या मागे, कन्हान येथे मोहम्मद ईब्राहीम मोहम्मद शफी, वय २६ वर्षे, रा. आझाद नगर, ड्रगन पॅंलेस टेम्पलच्या मागे, कामठी, ता. कामठी हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्‌टापट्‌टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता जुना नगर परीषदच्या मागे कन्हान येथे **आरोपी मोहम्मद ईब्राहीम मोहम्मद शफी, वय २६ वर्षे, रा. आझाद नगर, ड्रगन पॅंलेस टेम्पलच्या मागे, कामठी, ता. कामठी** हा कागदावर आकडे लिहुन सट्‌टापट्‌टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून रोख रक्कम २,३५०/— रूपये, सट्टापट्टी साहित्य असा एकुण २,६३५/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी मोहम्मद ईब्राहीम मोहम्मद शफी, वय २६ वर्षे, रा. आझाद नगर, ड्रॅगन पॅंलेस टेम्पलच्या मागे, कामठी, ता. कामठी याच्या विरूद्ध कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने